# सार्वजनिक क्षेत्राच्या बँकेतील वाढती अनुत्पादक मालमत्ता : एक समस्या

**प्रा. डॉ. विजय के.बन्सोड**
सहयोगी प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. एम.के. उमाठे कॉलेज
नागपूर.
Email: bansodvijay@gmail.com

---

**प्रास्ताविक :**

भारतीय बँकिंग कंपनी ॲक्ट १९४९— "बँकिंग कंपनी ती कंपनी आहे जी बँकिंगचे कार्य करते. बँकिंग म्हणजे लोकांना उधार देण्याकरिता अथवा विनीयोग करण्याकरिता मुद्रा ठेवीच्या रूपाने स्वीकारणे होय. अशा ठेवी मागणी करताच अथवा धनादेश, विकर्ष, आदेश यांच्या द्वारे शोधनीय असतात."

या तत्वानुसार भारतात स्वातंत्र्यानंतर बँकांची वाटचाल सुरू झाली. पुढे बँकेचे कार्य ठेवी स्वीकारणे व कर्ज देणे एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता प्रत्यय निर्मिती हे मोठे शस्त्र बँकाजवळ आले. या शस्त्रामुळे बँका आता श्रींमत होऊ लागल्या होत्या. त्या बँका खाजगी भांडवलदारांच्या असल्यामुळे खाजगी भांडवलदार व बँकांचे शेअरधारक अधिक श्रीमंत होत गेले. बँकिंग क्षेत्र व त्याचे फायदे केवळ काही विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित होते.

बँकिंग क्षेत्राचे फायदे देश, अर्थव्यवस्था व सामान्यांपर्यंत पोहचवीने दुरापास्त झाले होते. भारतात इंपीरियल बँकेचे राष्ट्रीयकरण व १९५५ साली स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेपासूनच बँकांच्या राष्ट्रीयकरणाला चालना मिळाली होती. म्हणूनच समुचीत प्रत्यय नियंत्रण करणे, व्यापारचक्र पासून अर्थव्यवस्थेचा बचाव करणे, समाजवादी रचनेचे ध्येय साध्य करणे, व्यापारी बँकेच्या खाजगी धोरणावर नियंत्रण आणणे, बँकांच्या लाभावर सामाजिक मालकी प्रस्थापित करणे, आर्थिक नियोजन सफल करणे, ठेवीदार व कर्जदार यांचे हित साधने, मौद्रीक एकत्रीकरण, देशातील औद्योगिक व ग्रामिण अर्थपुरवठ्यांना साहय्य करणे, विदेशी बँकांशी स्पर्धा करणे इत्यादी कारणांसाठी १९ जुलै, १९६९ रोजी १४ बँकांचे व १५ एप्रिल १९८० रोजी ६ बँकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. आता भारतीय बँकिंग क्षेत्र हे विशिष्ट वर्गाकरिता मर्यादित न राहता ते आता सर्व सामान्यांसाठी कार्य करू लागले होते. (Banking sector converts classes in to masses).

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१. सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांचा अभ्यास करने.
२. सार्वजनिक क्षेत्रातील बॅकेतील सद्यास्थितीचा अभ्यास करने.
३. अनुत्पादक मालमत्तेचा अभ्यास करने.
४. वाढत्या अनुत्पादक मालमत्तेच्या कारणांचा शोध घेउन त्या संबंधीत उपाययोजना सुचविने.

सन २०१७ पर्यंत भारतात सार्वजनिक क्षेत्रातील २७ बँका कार्यरत होत्या. या बँका खालील प्रमाणे आहेत.

| | बॅंकेचे नाव | विलिनीकरनाचे वर्ष |
|---|---|---|
| १) | स्टेट बॅंक ऑफ इंडिया (सहयोगी बॅंका) | — १९५५ |
| २) | स्टेट बॅंक ऑफ इंदौर सौराष्ट्र | — २०१० |
| ३) | स्टेट बॅंक ऑफ हैद्राबाद | — २०१७ |
| ४) | स्टेट बॅंक ऑफ बिकानेर ॲण्ड जयपुर | — २०१७ |
| ५) | स्टेट बॅंक ऑफ मैसूर | — २०१७ |
| ६) | स्टेट बॅंक ऑफ पटियाला | — २०१७ |
| ७) | स्टेट बॅंक ऑफ त्रावणकोर | — २०१७ |
| ८) | भारतीय महिला बॅंक | — २०१७ |
| ९) | आंध्रा बॅंक | — १९८० |
| १०) | अलाहाबाद बॅंक | — १९६९ |
| ११) | बॅंक ऑफ बडोदा | — १९६९ |
| १२) | बॅंक ऑफ इंडिया | — १९६९ |
| १३) | बॅंक ऑफ महाराष्ट्र | — १९६९ |
| १४) | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया | — १९६९ |
| १५) | कॅनरा बॅंक | — १९६९ |
| १६) | देना बॅंक | — १९६९ |
| १७) | कार्पोरेशन बॅंक | — १९८० |
| १८) | इंडियन बॅंक | — १९६९ |
| १९) | इंडियन ओवरसीस बॅंक | — १९६९ |
| २०) | ओरीयंटल बॅंक ऑफ कॉमर्स् | — १९८० |
| २१) | पंजाब ॲण्ड सींध बॅंक | — १९६९ |
| २२) | सिंडीकेट बॅंक | — १९६९ |
| २३) | युको बॅंक | — १९६९ |
| २४) | युनियन बॅंक ऑफ इंडिया | — १९६९ |
| २५) | विजया बॅंक | — १९६९ |
| २६) | पंजाब नॅशनल बॅंक (न्यु. बॅंके ऑफ इंडिया सम्मीलीत १९९३) | — १९६९ |
| २७. | आय.डी.बी.आय. बॅंक | — १९६४ |

वरिल सर्व बॅंकांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला उत्तुंग अशी भरारी देण्याचे अती उत्तम कार्य केले. १९९३ मध्ये न्यु बॅंक ऑफ इंडिया या बॅंकेचे दिवाळे निघाल्यामुळे तिला पंजाब नॅशनल बॅंकेत विलय करण्यात आले. १९९१ च्या उदारीकरण धोरणांतर्गत खाजगी बॅंका मोठ्या प्रमाणात उघडण्यात आल्या. त्यांना मिळालेले सरकार व खाजगी उद्योगपतींचे प्रोत्साहन यामुळे आता खाजगी बॅंकाचा विस्तार व सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकाचा ऱ्हास सुरू झाला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकात वाढलेला भ्रष्टाचार, कर्ज बुडव्यांच्या संख्येत झालेली वाढ, लालफित शाही, राजकियीकरण, मंत्र्यांचा हस्तक्षेप, कर्मचारी संघटनेचे केवळ पगार वाढीकडेच लक्ष, आधुनिकीकरण व उच्च सेवांचा अभाव, वाढते थकीत कर्ज, सरकारी उदासिनता, नॉन परफॉर्मिंग मालमत्तेत वाढ यामुळे आता उत्तुंग शिखरावर असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकांना उतरती कळा लागली होती. यामुळेच सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकांचा आता उलटा प्रवास सुरू झाला आहे.


**बॅंकिंग क्षेत्रातील सुधारणेची पार्श्वभूमी :**

२०१४ साली भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेत आल्यापासूनच सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या सुधारणेचे पर्व सुरू झाले. काँग्रेसप्रणित सरकारच्या कालावधीत अधिक परताव्याच्या आशेने बँकांनी सढळ हस्ते कर्ज दिले व उद्योजक व व्यापाऱ्यांनी ते मोठया प्रमाणत घेतले. मात्र नवीन सरकारच्या काळात ढासळती अर्थव्यवस्था, सरकारच्या ढीसाळ कामगीरीमुळे व कोविड १९ च्या महाभयंकार रोगराइ मुळे सर्वसामान्य जनता, व्यापारी व उद्योगपती कर्ज फेडू शकले नाहीत. या सरकारच्या काळात कर्ज बुडव्यांच्या संख्येत वाढ झाली तसेच अनेक कर्ज बुडवे उद्योगपती विदेशात पळुन गेलेत त्यामुळे बँका तोट्यात आल्या व बँकांच्या बुडीत कर्जात एन.पी.ए. (Non Performing Assest) कमालीची वाढ झाली व या सर्वांचा परिणाम म्हणून अनुत्पादक मालमत्ता या समस्येने संपूर्ण बँकीग क्षेत्राला ग्रसले असून देशातील संपूर्ण बँकां या समस्येतुन बाहेर निघण्याचे मार्ग शोधत आहेत.

**अनुत्पादक मालमत्ता म्हणजे काय :**

बँकांनी आपल्या ग्राहकांना दिलेली कर्जे व अग्रीम यांना बँकांची मालमत्ता समजली जाते. बँकांनी कर्जे व अग्रीम दिल्यामुळे याच्या परताव्याच्या स्वरूपात मुद्दलाबरोबर मिळनाऱ्या व्याजामुळे बँकांना ग्राहकांना पाडून दिलेल्या हप्त्यानुसार उत्पन्न मिळते. मात्र ग्राहकाने जर मुदतीच्या तारखेपर्यंत हप्ता किंवा व्याजाचा भरणा केला नाही तर ते कर्ज थकीत होते. रिझर्व बँकेच्या निर्देशा प्रमाणे ग्राहकांकडून व्याज किंवा हप्ता यांचा भरणा ९० दिवसापेक्षा अधिक कालावधीसाठी केला गेला नसल्यास ते अनुत्पादक कर्ज मानले जाते. कृषी पीक कर्जाच्या बाबतीत अल्पमुदतीच्या पीक कर्जाचे व्याज किंवा हप्ते हे दोन हंगामाच्या कालावधीत व दिर्घ मुदतीच्या पीक कर्जाचे व्याज किंवा हप्ते हे एका हंगामाच्या कालावधीत भरले गेले नसल्यास तर ते अनुत्पादक कर्जात वर्गीकृत केले जाते.

**भारतात अनुत्पादक मालमत्तेचे (एन.पी.ए) निकष खालील तीन प्रकारात विभागले जातात.**




सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची मागील दहा वर्षातील नऊ लाख कोटी रक्कम बुडीत खात्यात गेली असून त्या संबंधीत आकडेवारी खलील प्रमाणे आहे.

| आर्थिक वर्ष | बुडीत कर्ज (कोटीत) |
|---|---|
| २०११– १२ | १५५५१ |
| २०१२– १३ | २७२३१ |
| २०१३– १४ | ३४४०९ |
| २०१४– १५ | ४९०१८ |
| २०१५– १६ | ५७५८५ |

| | |
|---|---|
| २०१६— १७ | ८१६८३ |
| २०१७— १८ | १२८२२९ |
| २०१८— १९ | १८३२०२ |
| २०१९— २० | १७५८७७ |
| २०२०— २१ | १३१८९४ |

(स्त्रोत: दैनीक लोकमत)

| बॅंकेचे नाव | | बुडीत कर्ज | बुडीत कर्जाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्टेट बॅंक ऑफ इंडिया (सहयोगी बॅंका) | १८८०६८ | ९.९७ |
| २ | आंध्रा बॅंक | १९४२८ | १३.३३ |
| ३ | बॅंक ऑफ बडोदा | ४६१७३ | ११.४० |
| ४ | बॅंक ऑफ इंडिया | ५१०१९ | १३.०५ |
| ५ | बॅंक ऑफ महाराष्ट्र | १८०४९ | १८.५९ |
| ६ | सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया | ३१३९८ | १८.२३ |
| ७ | कॅनरा बॅंक | ३७६५८ | १०.५६ |
| ८ | देना बॅंक | १२९९४ | १७.३७ |
| ९ | कार्पोरेशन बॅंक | २१७१३ | १५.४९ |
| १० | इंडियन बॅंक | ९६५३ | ७.२१ |
| ११ | इंडियन ओवरसीस बॅंक | ३५४५३ | २३.६० |
| १२ | युको बॅंक | २५०५४ | १९.८७ |
| १३ | युनियन बॅंक ऑफ इंडिया | ३७२८६ | १२.६६ |
| १४ | विजया बॅंक | ६८१२ | ७.३० |
| १५ | पंजाब नॅशनल बॅंक (न्यु. बॅंके ऑफ इंडिया सम्मीलीत १९९३) | ५७७२१ | १३.६६ |
| १६ | आय.डी.बी.आय.बॅंक | ५०१७३ | २४.११ |
| १७ | आयसीआयसी आय बॅंक | ४३१४८ | ७.९९ |
| १८ | ॲक्सीस बॅंक | २२०३१ | ५.०३ |
| १९ | एच.एफ.डी.सी. बॅंक | ७२४३ | १.२४ |
| २० | कोटक महिंद्र बॅंक | ३७२७ | २.५८ |
| २१ | आय.डी.एफ.सी बॅंक | २००४ | ४.९३ |
| २२ | फेडरल बॅंक | १८६८ | २.४२ |
| २३ | साउथ इंडियन बॅंक | १६९६ | ३.६१ |
| २४ | कर्नाटक बॅंक | १६९१ | ४.३४ |
| २५ | येस बॅंक | १३६४ | ०.९७ |
| २६ | सीटी युनियन बॅंक | ७३५ | ३.०५ |
| २७ | धनलक्ष्मी बॅंक | ३५४ | ५.६२ |
| २८ | डि.सी.बी. बॅंक | २८५ | १.७४ |

भारतातील प्रमुख बॅकांची माहीती पाहील्यास लक्षात येतेकी खाजगी बॅकांच्या तुलनेत सार्वजनीक क्षेत्रातील बॅकातील बुडीत कर्जाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

**बॅँकिंग क्षेत्रातील बुडीत कर्जाच्या वाढीची कारने :**

देशातील बॅँकिंग क्षेत्रातील कर्जाची वसुली कमी होउन बुडीत कर्जाच्या प्रमाणात सतत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. बुडीत कर्जात वाढ होण्याची मुख्य कारणे (घटक) खालील प्रमाने आहेत.

**अ) अंतर्गत घटक ब) बहिर्गत घटक**

**अ) अंतर्गत घटक :** बॅँकांच्या बुडीत कर्जात वाढ होण्याची अंतर्गत घटकातील मुख्य कारणे खालील प्रमाने आहेत.

**१) अयोग्य कर्जदार :** बॅँकांनी कर्ज मंजुर करताना कर्जदाराची पूर्ण चौकशी न करता कर्ज दिल्यास कर्ज बुडण्याचा धोका वाढतो.

२) **चुकीची माहिती** : कर्ज घेणारी व्यक्ती बरेचदा चुकीची किंवा अर्धवट माहिती देतात. तसेच बरेचदा जुण्या कर्जाची माहिती लपविण्याचा प्रयत्न केला जातो. अशा लोकांना कर्ज दिल्यास कर्ज बुडण्याचा धोका वाढतो. कर्ज मंजुर करताना कर्जदाराची यथायोग्य माहिती न घेतल्यास कर्ज बूडण्याचा धोका वाढतो.

३) **कर्ज परतफेडीत दीरंगाई** : काही कर्जदार कर्जाची परतफेड करण्यास मुद्दाम टाळाटाळ करतात या मुळे देखील कर्ज बुडण्याचा धोका वाढतो.

४) **बॅंक व कर्जदार यांच्यातील विसंवाद** : बॅंक व कर्जदार यांच्यात कर्जाची परतफेड करण्यावरून विसंवाद झाल्यास त्याची परिणीती वादात होउन कर्ज वसुलीस बाधा निर्मान होते.

५) **दोषपुर्ण व्यवस्थापन** : कर्ज मंजुर करताना कर्जदाराची कागतपत्रे व ठेवलेले तारण याची योग्य तपासनी न केल्यास कर्ज बुडण्याचा धोका वाढतो.

६) **कर्जाउ निधीचा गैरवापर** : बरेचदा कर्जदाराकडुन ज्या कारणाकरीता कर्ज घेतले जाते व ते मंजुर केले जाते कर्जदार ही कर्जाची रक्कम इतर कार्यात वापरून खर्च केली जात असल्याने कर्जाचा उद्देश पूर्ण न झाल्यास कर्ज बुडण्याचा धोका वाढतो.

७) **तंत्रज्ञानाचा अभाव** : व्यवसायासाठी कर्ज घेतलेले कर्जदार बरेचदा नविन तंत्रज्ञानाचा वापर न करता जुण्या तंत्राचाच उपयोग करतात त्यामुळे त्यांना व्यवसायात अपयश येते. याचा परीणाम कर्ज परतफेडीवर होउन बुडीत कर्जात वाढ होते.

८) **कर्जाच्या प्रमाणात वाढ** : सार्वजनीक क्षेत्रातील बॅंकानी व्यावसायीक व उद्योजकांना टारगेट पूर्ण करण्यासाठी बेसुमार कर्जवाटप केले. या कर्ज वाटपात अनेक त्रुटी असल्याने कर्ज परतफेडीची समस्या निर्माण झाल्यामुळे अनुत्पादक कर्जात वाढ झाली आहे.

९) **कर्जदारास कर्ज फेडण्यासाठी सवलती** : बॅंकांनी कर्जाचे हप्ते चुकविणाऱ्या ग्राहकांना कर्जवसुलीसाठी दीर्घकाळापर्यंत मुभा, निव्वळ कागदोपत्री व्यवहार व अनेक सवलती दिल्याने त्यांच्यात कर्ज परत करण्याची प्रवृत्तीत घट झाल्याने अनुत्पादक कर्जात वाढ झाली आहे.

१०) **वसुली मोहीमेचा अभाव** : सार्वजनीक क्षेत्रातील बँका दफ्तर दीरंगाई, लालफीतशाही व राजकिय दबावापोटी खाजगी क्षेत्रातील बँकाप्रमाणे वसुली मोहीम राबविण्यात अपयशी ठरल्या. याशीवाय कर्जदाराची उपयोगात नसलेली मालमत्तेची जप्ती व ती विकुणही कर्जवसुली अपूर्ण राहिल्याने अनुत्पादक कर्जात कमालीची वाढ झाली आहे.

**ब) बहिर्गत घटक** : बहिर्गत घटकावर कर्जदार किंवा बँक नियंत्रन ठेवू शकत नसुन या घटकाचे अनुचीत परीणाम संपुर्ण बँकिंग क्षेत्रावर होतो. बँकांच्या बुडीत कर्जात वाढ होण्याची बहिर्गत घटकांतर्गत मुख्य कारणे खालील प्रमाने आहेत.

१) **तेजी मंदीचे चक्र** : अर्थव्यवस्थेत तेजी मंदीचे चक्र अविरत सुरू असते. तेजीत बँकांना चांगल्या वसुलीमुळे नफा होतो. तर मंदीत विक्रीचे घटते प्रमाण व मालाला योग्य भाव मीळत नसल्याने कर्ज वसुलीवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

२) **नैसर्गीक आरिष्ट** : भूकंप, दुष्काळ, रोगराई, महापुर इत्यादी कारणामुळे देखील कर्ज वसुलीवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

**३) शासकिय बंधने :** देशातील सरकार काही वेळा एखाधा व्यवसायावर निर्बंध लादते अशावेळी कर्ज परतफेडीची समस्या निर्माण झाल्यामुळे अनुत्पादक कर्जात वाढ होते.

४) **कर्जमाफी** : सरकार तर्फे अनेकवेळा कर्जमाफी किंवा व्याज माफीची घोषणा केली जाते. यामुळे कर्जाची परतफेड थांबुन थकबाकी वाढते.

५) **सरकारी योजना राबविने** : देशातील सरकारद्वारे जनतेसाठी अनेक योजना राबविल्या जातात. या कर्ज योजना बँका संबंधीत असल्यास बँकांना या योजना राबविने बंधनकारक असते. अशा वेळेस या कर्जाचा व्यक्तिस लाभ झाला नसल्यास कर्ज परतफेडीची समस्या निर्माण झाल्यामुळे अनुत्पादक कर्जात वाढ होते.

**अनुत्पादक कर्जातील वाढीचा बँकिंग क्षेत्रावरील परिणाम :**

वाढत्या अनुत्पादक कर्जातील वाढीचा बँकिंग क्षेत्रावर विपरीत परिणाम होतो. **हे** परिणाम खालील प्रमाणे सांगता येतात.

**१) उत्पन्न व आर्थीक क्षमतेवर विपरीत परिणाम :** बँकांचे मुख्य उत्पन्न हे कर्ज परतफेडीतुन प्राप्त होत असते. परंतु कर्जदाराने जर कर्जाचे हप्ते थकविल्यास बँकांच्या उत्पन्नावर व आर्थीक क्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होतो.

**२) व्यवस्थापन व वसूली खर्चात वाढ :** कर्जदाराने जर कर्जाचे हप्ते थकविल्यास कर्ज वसुलीसाठी बँकांना बराच खर्च करावा लागतो. यामुळे बँकांच्या व्यवस्थापकीय खर्चात वाढ होउन बँकांना नाहक भुर्दंड सहन करावा लागतो.

३) **ठेवींच्या प्रमाणात घट** : अनुत्पादक कर्जातील वाढीमुळे एकीकडे कर्जदारांकडून कर्जाचे हप्ते थकविले जातात तर दुसरीकडे अशा ग्रहकांची बचत कमी होते या सर्वांचा परिणाम बँकांच्या ठेवींच्या प्रमाणात घट होण्यावर होतो.

४) **भांडवलाची कमतरता** : कर्जाचे वाटप केल्याने बँकांच्या भांडवलात घट होते. परंतु हेच कर्ज मोठया प्रमाणात थकल्यास बँकांना भांडवलाची कमतरता भासु लागुन परिणामत: अनुत्पादक कर्जातील वाढीमुळे बँकांची पत घटुन बँकां आर्थिक दीवाळखोरीकडे जाण्याचा धोका संभावतो.

**बँकिंग क्षोतील सुधारणा—**

- आय.डी.बी.आय. (Industrial Development Bank of India) चे शेअर एल.आय.सी. (L.I.C.) ने २१ जानेवारी २०१९ ला विकत घेतले. त्यामुळे भारतीय रिजर्व बँकेने या बँकेस खाजगी बँक म्हणून घोषीत केले.
- स्टेट बँक ऑफ इंडियात तिच्या सात सहयोगी बँकांचे सम्मीलीकरण १एप्रिल, २०१७ रोजी करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९ ला बँक ऑफ बरोडा या बँकेत विजया बँक व देना बँका यांचे विलीनीकरण करण्यात आले.ऩ
- १ एप्रिल, १९१९ ला पंजाब नॅशनल बँकेत ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स व युनायटेड बँक ऑफ इंडिया यांचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९ ला कॅनरा बँकेत सींडीकेट बँकेचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९युनियन बँक ऑफ इंडियात आंध्रा बँक, कार्पोरेशन बँकेचे विलीनीकरण करण्यात आले.
- १ एप्रिल, १९१९ ला इंडियन बँकेत अलाहबाद बँकेचे विलीनीकरण करण्यात आले.

**अनुत्पादक कर्जात घट करण्याहेतु उपाययोजना :**

अनुत्पादक कर्जात घट करण्याहेतु खालील उपाययोजना सुचविल्या आहेत.

अ) बँकांनी ग्राहकास कर्ज मंजुर करतेवेळी योग्य शहानिशा करूनच कर्ज द्यावे.

ब) बँकांनी ग्राहकास कर्ज मंजुर करतेवेळी यथोचीत तारणाशिवाय कर्जास मंजुरी देऊ नये.

क) बँकांनी दिर्घ मुदतीचे कर्ज न देता अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज प्रदान करावे.

ड) बँकांनी कर्ज लहान स्वरूपात अनेक कर्जदारास, अनेक व्यवसायात वितरीत करावे जेणेकरून कर्ज बुडण्याची जोखीम कमी होइल.

इ) बँकांनी कर्ज वसुलीसाठी वेगळा विभाग निर्माण करून कर्ज वसुलीसाठी प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.

फ) बँकांनी कर्ज केवळ पत असनाऱ्या व्यक्ती व उत्पादक कार्याकरिता दीले जाउन दीलेल्या कर्जाच्या उद्दिष्ट पुर्ततेचा पाठपुरावा करने गरजेचे आहे.

ग) बँकिंग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यात भ्रष्टाचाराचे लोन पसरले असून हे लोक आपल्या संबंधीतांना,परिचीत, नातेवाईक व श्रीमंतांना मोठया प्रमाणात कर्ज देतात व हे कर्जदार ओळखीचा फायदा घेउन कर्ज वेळेवर न फेडता कर्ज बुडविण्याचा प्रयत्न करतात सरकारनी बँकिंग प्रशासनाने यावर आळा घालावा.

ह) बँकिंग क्षेत्रात राजकिय हस्तक्षेप मोठया प्रमाणात वाढला असुन यावर नियंत्रण आणने आवश्यक झाले आहे.

न) कर्ज बुडव्यांवर कठोर कारवाई करून अशा कारवाईचा प्रचार व प्रसार करने योग्य होईल.

**निष्कर्ष :**

**बुडीत कर्ज हे** बँकिंग क्षेत्रासमोरील ज्वलंत समस्या असून यात घट घडवून आनण्याचे आव्हान बनले आहे. या समस्येतुन बाहेर येण्यासाठी बॅकेतील कर्मचारी व अधिकारी यांनी आपले कार्य कर्तव्यनिष्ठेने व पारदर्शक रित्या पार पाडले, सरकारी हस्तक्षेप बंद होउन बँकिंग क्षेत्राला अधिक स्वायत्तता देउन सुदृढ बँकिंग क्षेत्र तयार करता येइल. तसेच योग्य, प्रमाणिक व गरजु बॅक ग्राहकास योग्य कामासाठी योग्य वेळी कर्ज सहज उपलब्ध झाल्यास तोही मीळालेल्या कर्जाचा सदउपयोग करून कर्जाची परतफेड योग्य वेळेत करील.

१ फेब्रुवारी, २०२१ च्या अर्थसंकल्पात मध्ये भारताच्या अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांनी सन २०२१—२२ या वर्षासाठी निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून १.७५ लाख कोटी जमा करण्यासाठी सर्वप्रथम आयडीबीआय बॅकेतून सरकार निर्गुंतवणुक करणार आहे. तसेच १२ सार्वजनिक बँकांमधील दोन बँकांच्या खाजगीकरणाचे संकेत दिले असून या बँका बँक ऑफ महाराष्ट्र व पंजाब ॲण्ड सींध बँक राहील याची दाट शक्यता आहे. तसेच सरकार सार्वजनिक क्षेत्रात केवळ सहा मोठ्या बँका ठेवण्याच्या मनस्थितीत असल्याने भविष्यात इंडियन बँक, अलाहाबाद बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओवरसीज बँक, युको बँक यांचे विलिनीकरण किंवा खाजगीकरणाची शक्यता मोठ्या प्रमाणात राहीलच. या सर्वांचा परिणाम हा अर्थव्यवस्थेवर तर होईलच मात्र याचा अधिक वाईट परिणाम देशातील सर्वसामान्य जनता व आरक्षीत वर्गावर मोठ्या प्रमाणात झाल्याशिवाय राहणार नाही.

संदर्भ:


- डॉ. मुकुंद महाजन, भारतीय बॅक प्रणाली २००५, निराली प्रकाशन, पुणे.
- डॉ. दीपक अग्रवाल,मुद्रा, बैंकिंग, लोक वित्त, हिमालया पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.मुंबई ‘.
- डॉ.जी.एन. झामरे, ‘भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
- Datt R. and Sundharam K.P.M. (2016): *Indian economy*. S. Chand and Company Ltd., New Delhi.
- प्रतियोगीता दर्पण/जून/२०२०/२७
- अर्थसंवाद मराठी अर्थशास्त्र परिषद विविध अंक
- Knowledge Resonance A Half Yearly National Research Journal volume 8,9.